# क्वारंटाईन सेंटर होत आहेत फुल्ल

## सद्य:स्थितीत १५ सेंटरवर १८३२ व्यक्ती; ४९४ होम क्वारंटाईन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर शहरातील क्वारंटाईन सेंटर फुल्ल होत आहेत. राज्यभरातून त्यात विशेषत: पुणे, मुंबईहून येणाऱ्या नागरिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी, त्यांचे स्वॅब घेऊन त्यांना क्वारंटाईन केले जात आहे. शनिवारी शहरातील १५ क्वारंटाईन सेंटरमध्ये १८३२ व्यक्ती होत्या. होम क्वारंटाईन म्हणून ४९४ नागरिकांना ठेवण्यात आले आहे.

महापालिकेच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या क्वारंटाईन(अलगीकरण कक्ष)सेंटरमध्ये १८३२ नागरिकांना ठेवण्यात आले. यात शेंडापार्क येथील आरोग्य प्रशिक्षण केंद्रातील अलगीकरण कक्षात ७०, खासगी ठिकाणी ३५, अंडी ऊबवणी केंद्र येथे ४५, पंजाबराव देशमुख वसतिगृह १०७, गव्हर्मेंट पॉलिटेक्निक १३ व राजाराम कॉलेज ४३, अल्पसंख्याक मुलींचे वसतिगृह ९६, आयसोलेशन हॉस्पिटल १०, कृषी विद्यापीठ वसतिगृह १५२, शिवाजी विद्यापीठ ४१९, शिवाजी विद्यापीठ मुलांचे वसतिगृह ४७१, न्यू कॉलेज वसतिगृह ८९, सैनिकी मुलींचे वसतिगृह ५४, विवेकानंद कॉलेज ९९ व कमला कॉलेज येथे १२९ नागरिकांना अलगीकरण कक्षात ठेवण्यात आले आहे. या सर्वांना चौदा दिवस या ठिकाणी ठेवण्यात येणार आहे.

# महाविद्यालये, अधिविभागात मार्गदर्शन, समुपदेशन कक्ष

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांना परीक्षा, शैक्षणिक वेळापत्रकाबाबत मार्गदर्शन, सहाय्य मिळण्यासाठी अधिविभाग, महाविद्यालयामध्ये 'विद्यार्थी मार्गदर्शन आणि समुपदेशन कक्ष' स्थापन करण्यात येणार आहेत.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भाव व लॉकडाऊनमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठाच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रक नियोजनासाठी राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. समिती अहवालातील शिफारसी शासनाने स्वीकृत केल्या आहेत. विद्यापीठामार्फत संबंधित घटकांना परीक्षेसंदर्भात प्राथमिक माहिती व्हावी, यासाठी विद्यापीठाच्या वतीने परिपत्रक काढण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन विद्यार्थी मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष स्थापन केला जाणार आहे. कक्षाचे काम पाहण्यासाठी शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार आहे. आवश्यक त्या सुविधा, शिक्षकेतर मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यापीठस्तरावरील माहिती, निर्णय यांची माहिती याबरोबरच विद्यार्थ्यांच्या शंका निवारण, चौकशीसाठी विद्यापीठाच्या संबंधित परीक्षा विभागातील प्रमुखांचे संपर्कासाठी मोबाईल नंबर देण्यात आले आहेत. अधिक माहितीसाठी परीक्षा विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी केले आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

# तणावमुक्तीसाठी प्रत्येक काम आनंदाने स्वीकारण्याची गरज

## डॉ. एस. एस. वेरनेकर; विद्यापीठात ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वेगवेगळ्या कारणांनी ताण येतो. ज्या गोष्टी आपण बदलू शकतो, त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. ज्या गोष्टी हातात नाहीत याची अतिचिकित्सा सोडून प्रत्येक काम आनंदाने स्वीकारून ते पूर्ण केले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. एस. एस. वेरनेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे वाणिज्य व व्यवस्थापनचे विद्यार्थी, शिक्षक यांच्यासाठी एकदिवसीय ऑनलाईन ताणतणाव व्यवस्थापन कार्यशाळा झाली. पहिल्या सत्रात डॉ. वेरनेकर यांनी ताणतणाव व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, काही प्रमाणात ताण असणे गरजेचे आहे; पण अनावश्यक ताण निर्माण झाला तर अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशावेळी हा अनावश्यक ताण कमी करण्यासाठी हा ताण निर्माण होण्याची कारणे शोधली पाहिजेत.

एमबीए युनिटचे संचालक डॉ. एच. एम. ठकार म्हणाले, तणावाचे योग्य व्यवस्थापन न झाल्यास त्याचे गंभीर परिणाम स्वतःला, कुटुंबाला काही वेळा समाजाला भोगावे लागतात. अनावश्यक ताण निर्माण होणार नाही, यासाठी प्रत्येकाने दक्ष असणे गरजेचे आहे.

डॉ. ए. एम. गुरव म्हणाले, कोरोनामुळे सर्वजण लॉकडाऊनमध्ये आहेत. अशाप्रसंगी ताण का निर्माण होतोय याचा अभ्यास करून अनावश्यक ताण कमी करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. ऑनलाईन कार्यशाळेचे महेश चव्हाण यांनी आयोजन केले. डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले.

# पदवी, पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १ जुलैपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत घेण्यात येणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. बी. ए., बी. कॉम., बीएस. सी. सेमिस्टर सहा आणि एम. ए., एम. कॉम., एमएस. सी. सेमिस्टर चार, नसेच पाच वर्षाचा अभ्यासक्रम आर्कीटेक्चर आणि विधी(लॉ)सेमिस्टर दहाच्या परीक्षा होणार आहेत. ही परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे काही विषय बॅकलॉग राहिलेले असतील तर त्या विषयांचीही परीक्षा घेतली जाणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

ज्या विद्यार्थ्यांचे मागच्या सेमिस्टरचे विषय राहिलेले आहेत. अशा विषयांच्या परीक्षाही घेतल्या जाणार आहेत. परीक्षेच्या नियोजनासंदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.



- **परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक पळसे यांची माहिती**
- **महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार परीक्षा घेणार**

**सरासरीनुसार लागणारे निकाल**

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्व महाविद्यालयातील तीन वर्षीय अभ्यासक्रम (बी.ए., बी. कॉम., बी. एस्सी.च्या सेमिस्टर दोन आणि व्दितीय वर्ष सेमिस्टर चार. दोन वर्षाचा अभ्यासक्रम (एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी.) प्रथम वर्ष सत्र दोन. चार वर्षीय अभ्यासक्रमातील प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाचे अभ्यासक्रम (बी. ई., बी. टेक.) प्रथम वर्ष सत्र दोन, व्दितीय वर्ष सत्र चार आणि तृतीय वर्ष सत्र सहा. पाच वर्षीय अभ्यासक्रम प्रथम, व्दितीय, तृतीय व चतुर्थ वर्षाचे अभ्यासक्रम प्रथम वर्ष सेमिस्टर दोन, व्दितीय वर्ष सेमिस्टर चार , तृतीय वर्ष सेमिस्टर ६ व चतुर्थ वर्ष सेमिस्टर आठचे निकाल समितीने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार निकाल जाहीर केले जाणार आहेत.

अफववांवर विश्वास ठेवू नये ज्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापन झालेले नाही. त्यांनी महाविद्यालयात जावून अंतर्गत मूल्यमापनाचे काम पूर्ण करून घ्यावे. शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.

# विद्यापीठाच्या परीक्षा जुलैमध्ये

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १ ते ३१ जुलै या कालावधीत होणार आहेत. राज्य सरकारच्या मार्गदर्शक नियमावलीनुसार परीक्षेचे नियोजन प्रशासनाने केले आहे. विद्यापीठाच्या वेबसाइटवर परीक्षेसंबंधी माहिती उपलब्ध केली आहे. विद्यापीठाच्या स्तरावर सध्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्याचे काम सुरू आहे. अधिकार मंडळाच्या मान्यतेनंतर मे महिन्याच्या अखेरीस सविस्तर वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे.

दरम्यान सद्यस्थितीमुळे सरकारकडून परीक्षेसंदर्भात ज्या सूचना येतील तशी कार्यवाही केली जाईल, असे परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी यासंदर्भात माहिती दिली आहे. त्यानुसार बीए, बीकॉम, बीएसस्सी सेमिस्टर सहा आणि एमए, एमकॉम, एमएस्सी सेमिस्टर चारच्या परीक्षांचा समावेश आहे.



## वेबसाइटवर माहिती उपलब्ध; वेळापत्रक तयार करणार

## परीक्षा न होता निकाल जाहीर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्व कॉलेजमधील बीए, बीकॉम, बीएस्सीच्या सेमिस्टर दोन आणि दुसऱ्या वर्षांतील सेमिस्टर चारच्या अभ्यासक्रमांचे निकाल सरासरीनुसार जाहीर करण्यात येणार आहेत. सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार लगतच्या एकाच सत्राचे ५० टक्के गुणांच्या आधारावर व ज्या सत्राचा निकाल घोषित होणार आहे, त्या सत्राच्या ५० टक्के अंतर्गत गुणाच्या आधारे घोषित होईल. एमए, एमकॉम, एमएस्सी अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्रातील सेमिस्टर दोनचा निकाल सरासरीनुसार होईल. चारवर्षीय अभ्यासक्रमातील बीई, बीटेकच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाचे अनुक्रमे सत्र दोन, सत्र चार आणि सत्र सहा आणि पाच वर्षीय अभ्यासक्रमातील प्रथम, द्वितीय, तृतीय व चौथ्या वर्षांतील सेमिस्टर अनुक्रमे सत्र दोन, सत्र चार, सत्र सहा आणि सत्र आठची परीक्षा न होता निकाल जाहीर होणार आहे.

## अशी आहे तयारी

ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे निकाल घोषित होतील, त्यांना श्रेणी सुधारण्यासाठी पुन्हा परीक्षा द्यावयाची असल्यास संबंधितांनी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर चार महिन्यात परीक्षा देता येईल. दोन वर्षांच्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या सत्र दोनच्या विद्यार्थ्यांचा निकाल पुढीलप्रमाणे घोषित होईल. सत्र एकमध्ये विद्यार्थ्यास ६६ टक्के गुण असतील तर त्यातील पन्नास टक्के म्हणजे ३३ आणि सत्र दोनमध्ये अंतर्गत गुण १०० गुणांत रुपांतरित करण्यासाठी ८० असतील त्यातील ४० असे एकूण ७३ टक्के गुण देत निकाल घोषित केला जाईल.

“महाविद्यालय व विद्यापीठीय परीक्षेसंदर्भात विद्यापीठ प्रशासनाने वेबसाइटवर सविस्तर मार्गदर्शनपर सूचना केल्या आहेत. त्या सूचना विद्यार्थ्यांनी वाचाव्यात. परीक्षांसंबंधी प्रत्येक महाविद्यालयात मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरू करण्याच्या सूचना केल्या आहेत. विद्यार्थ्यांना शंका असल्यास वेबसाइटवर दिलेल्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

– गजानन पळसे,
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ